# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः03.03.2025** **वारःसोमवार**

---

1. जागतिक वन्यजीव दिवसानिमित्त आज देशभरांत विविध कार्यक्रम
2. दुग्ध क्षेत्रातील कार्यशाळेचं आज अमित शहा यांच्या हस्ते उद्घाटन
3. भारत आणि अमेरिकेदरम्यान व्यापार कराराच्या चर्चेसाठी उद्योग मंत्री पियुष गोयल अमेरिका दौऱ्यावर
4. युक्रेनमध्ये शांतता नांदावी यासाठी चार कलमी रुपरेखा तयार-लंडनमध्ये परिषद आणि
5. आय सी सी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत अखेरच्या साखळी सामन्या भारताचा न्युझिलंडवर विजय

**जागतिक वन्यजीव दिवस**

आज जागतिक वन्यजीव दिवस आहे. पर्यावरण संतुलन, वन्यप्राण्याचं संरक्षण आणि संवर्धनासाठी प्रयत्न करण्याच्या उद्देशानं जागरुकता निर्माण करण्यासाठी आज विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज जागतिक वन्यजीव दिनानिमित्त गुजरातमधील जुनागड जिल्ह्यातील सासण गिर इथं राष्ट्रीय वन्यजीव मंडळ अर्थात NBWLच्या बैठकीत अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत. या बैठकीमध्ये लष्करप्रमुख, विविध राज्यांचे सदस्य, या क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, मुख्य वन्यजीव वॉर्डन आणि विविध राज्यांचे सचिव अशा 47 सदस्यांचा समावेश आहे. हे मंडळ पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली वन्यजीव आणि वनांचे संवर्धन आणि विकास करण्यासाठी काम करते. बैठकीनंतर, मोदी सासण इथल्या काही महिला वन कर्मचाऱ्यांशीही संवाद साधतील. आज सकाळी, पंतप्रधान गीर राष्ट्रीय उद्यानात सिंह सफारी करणार आहे. काल, त्यांनी जामनगरमधील वंतारा प्राणी संवर्धन केंद्राला भेट दिली. तसंच सोमनाथ मंदिरात जाऊन पुजाअर्चना केली. पंतप्रधानांनी काल सोमनाथ विश्वस्त मंडळाची बैठकही घेतली. ते शनिवारपासून 3 दिवसांच्या गुजरात दौऱ्यावर आहेत.

सेबी

भांडवली बाजारातील गैरव्यवहार प्रकरणी भारतीय रोखे आणि विनिमय मंडळ अर्थात सेबीच्या माजी प्रमुख माधवी पुरी बुच आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांविरोधात प्राथमिक माहिती अहवाल अर्थात FIR दाखल करण्याचे निर्देश मुंबईतील विशेष न्यायालयानं लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला दिले आहेत. ठाण्यातील पत्रकार सपन श्रीवास्तव यांनी दाखल केलेल्या याचिकेवर विशेष न्यायाधीश एस. ई. बांगर यांनी सेबी बाजारातील कथित फसवणूक प्रकरणात हा आदेश दिला. या चौकशीवर न्यायालय लक्ष ठेवून असेल तसंच संबंधित अधिकाऱ्यांना या प्रकरणाचा सध्यस्थितीचा अहवाल सादर करण्याचे निर्देश देखील देण्यात आले आहेत. भांडवली बाजारासाठी निर्धारित निकषांची पूर्तता न करणाऱ्या कंपनीला सूचीबद्ध करण्याची परवानगी देण्यात आली होती आणि बाजारात फेरफार करुन फसवणूक केल्याचा सेबीच्या अधिकाऱ्यांवर आरोप आहे. ज्या अधिकाऱ्यांविरुद्ध एफआयआर दाखल करण्याचा आदेश देण्यात आला आहे, त्यात माजी अध्यक्षा माधवी पुरी बुच, सेबीचे तीन सध्याचे पूर्णवेळ सदस्य आणि दोन मुंबई शेअर बाजारातील माजी अधिकाऱ्यांचा समावेश आहे. असं सेबीनं स्पष्ट केलं आहे.

अमित शहा

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा आज नवी दिल्ली इथं दुग्ध क्षेत्रातील शाश्वतता आणि दूध उत्पादनांचं वितरणआणि क्रयशक्ती या विषयावरील कार्यशाळेचे उद्घाटन करतील. पर्यावरणाचा समतोल राखून, आर्थिक विकास सुनिश्चित

करताना शाश्वत दुग्धव्यवसायाला चालना देण्याच्या उद्देशाने सहकार, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्यव्यवसाय मंत्रालयाकडून राबवण्यात येत असलेली धोरणं आणि उपक्रम याबाबत कार्यशाळेत चर्चा आणि मार्गदर्शन केलं जाणार आहे. जैवइंधन प्रकल्पासाठीचं नवं तंत्रज्ञान या विषयावरही अनेक सत्र आयोजित केली जाणार आहेत.

**पियुष गोयल**

भारत आणि अमेरिकादरम्यान प्रस्तावित द्विपक्षीय व्यापार करारासाठी चर्चा करण्याच्या उद्देशानं, वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल आजपासून वॉशिंग्टन दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान, ते अमेरिकन व्यापार प्रतिनिधी जेमिसन ग्रीर आणि अमेरिकन वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांच्याशी चर्चा करण्याची शक्यता आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अलीकडील वॉशिंग्टन दौऱ्यादरम्यान, भारत आणि अमेरिकेने 2030 पर्यंत द्विपक्षीय व्यापार दुप्पट करून 500 अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत करण्याची आणि चालू वर्षासाठी परस्पर हिताचे, विविध क्षेत्रातील द्विपक्षीय व्यापार कराराच्या पहिल्या टप्प्यासाठी चर्चा झाली होती.

**उत्तराखंड**

उत्तराखंडमधील माना इथं हिमस्खलन झालेल्या घटना स्थळी शोध आणि बचाव कार्य काल पूर्ण झालं असल्याची माहिती भारतीय लष्करानं काल दिली. या मोहिमेत 46 कामगारांना यशस्वीरित्या वाचवण्यात आले असून बचाव पथकाच्या अथक प्रयत्नांनंतरही 8 जणांचे प्राण वाचवता आले नाहीत, या दुर्घटनेत जीव गमावलेल्यांच्या कुटुंबांप्रती भारतीय लष्कराने शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत.

**युक्रेन-युरोप**

रशिया–युक्रेन दरम्यान युध्दबंदी करारासाठी योजना आखण्याच्या उद्देशानं लंडनमध्ये परिषद सुरु आहे. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष ब्लादिमिर झेलेनस्की या बैठकीला उपस्थित आहेत. युक्रेनमध्ये शांतता नांदावी यासाठी चार कलमी रुपरेखा तयार करण्यात आली आहे. ब्रिटन तसंच अन्य युरोपीय देश युक्रेनची साथ देणार आहे. असं ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टामर यांनी सांगितलं. युद्ध सुरू असताना युक्रेनमध्ये लष्करी मदतीचा प्रवाह सुरू ठेवणं आणि रशियावर आर्थिक दबाव वाढवणं, शाश्वत शांततेसाठी युक्रेनचे सार्वभौमत्व आणि सुरक्षितता सुनिश्चित करणे, शांतता करार झाल्यास, भविष्यात रशियाकडून युक्रेनमध्ये होणाऱ्या कोणत्याही आक्रमणाला रोखण्यासाठी युरोपीय नेत्यांनी मदत करणं आणि युक्रेनमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी 'इच्छुक समुहाची युती' तयार करणं. अशा 4 मुद्यांचा समावेश आहे. यावेळी स्टारमर यांनी एका कराराची घोषणा केली ज्यामुळे युक्रेनला 5 हजारहून अधिक हवाई संरक्षण क्षेपणास्त्रं खरेदी करण्यासाठी एकंदर दिड अब्ज पौंड किमतीचा निर्यात वित्तपुरवठा वापरता येईल. शिखर बैठकीत जर्मनी, डेन्मार्क, इटली, नेदरलँड्स, नॉर्वे, पोलंड, स्पेन, कॅनडा, फिनलंड, स्वीडन, झेक प्रजासत्ताक आणि रोमानियाचे नेते उपस्थित होते. तसंच तुर्कीचे परराष्ट्र मंत्री, नाटोचे सरचिटणीस आणि युरोपियन कमिशन आणि युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष देखील उपस्थित होते.

**तेलंगण**

श्रीशैलम लेफ्ट बँक कॅनाल (एसएलबीसी) बोगदा प्रकल्पाच्या अर्धवट कोसळलेल्या बोगद्यात अडकलेल्या आठ जणांचे नेमके स्थान अद्याप समजून शकलेलं नाही आणि सरकार बचाव कार्याला गती देण्याचा प्रयत्न करत आहे. असं तेलंगणचे मुख्यमंत्री ए. रेवंत रेड्डी यांनी काल नागरकुरनूल जिल्ह्यातील अपघातस्थळाला भेट दिल्यानंतर माध्यमांशी बोलताना सांगितलं. सरकारनं बचाव कार्याचे नेतृत्व करणाऱ्या अधिकाऱ्यांना बचाव कर्मचाऱ्यांना धोका टाळण्यासाठी आवश्यक असल्यास बोगद्यात रोबोट वापरण्याची सूचना केली आहे. सरकार या समस्येचे निराकरण करण्यास कटिबद्ध आहे आणि अपघातामुळे नुकसान झालेल्या कुटुंबांना मदत करण्यास देखील तयार आहे. खराब झालेले कन्व्हेयर बेल्ट दुरुस्त झाल्यानंतर आणि आजपासून बचावकार्य पूर्ववत होण्याची अपेक्षा आहे. गेल्या महिन्याच्या 22 तारखेपासून एसएलबीसी बोगद्याच्या कोसळलेल्या छताखाली दोन अभियंत्यांसह आठ जण अडकले आहेत आणि त्यांना सुरक्षित ठिकाणी आणण्यासाठी बचाव कार्य युध्दपातळीवर सुरू आहे.

**जम्मू-काश्मीर**

जम्मू-काश्मीर विधानसभेचे महिनाभर चालणारे अर्थसंकल्पीय अधिवेशन आज जम्मूमध्ये नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांच्या अभिभाषणाने सुरू होणार आहे गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात सत्तेत आल्यानंतर मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांच्या नेतृत्वाखालील हे पहिलंच अधिवेशन आहे. 2018 मध्ये पीडीपी आणि भाजपा युतू सरकारच्या कार्यकाळांत अर्थसंकल्पीय अधिवेशन झालं होतं. मुख्यमंत्री आणि अर्थमंत्री ओमर अब्दुल्ला येत्या 7 तारखेला अर्थसंकल्प सादर करतील.

**अधिवेशन**

महाराष्ट्र विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन आजपासून सुरू होत आहे. राज्याचा आगामी वर्षाचा अर्थसंकल्प 10 मार्च रोजी सादर होणार आहे.

**क्रिकेट**

आय सी सी च्या चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत काल दुबई इथं झालेल्या अंतिम साखळी सामन्यात भारतानं न्यूझीलंडवर 44 धावांनी विजय केला. प्रथम फलंदाजी करताना श्रेयस अय्यरने 79 धावांसह अक्षर पटेल सोबत केलेल्या 98 धावांच्या भागीदारीच्या जोरावर भारताने 249 धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल न्यूझीलंड संघाला 205 धावा करता आल्या. किवी संघाकडून केन विल्यमसनने सर्वाधिक 81 धावा केल्या. वरुण चक्रवर्तीने 42 धावात 5 गडी बाद केले तर कुलदीप यादवने 2 गडी बाद केले. उपांत्यफेरीत भारताचा उद्या ऑस्ट्रेलियाविरुद्ध दुबई इथं सामना होणार आहे. तर उपांत्यफेरीतील दुसरा सामना दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड संघात 5 मार्च रोजी होणार आहे.

**हवामान-पाऊस**

उत्तरेकडील काही भागात तसंच जम्मू काश्मीर, लडाख आणि हिमाचल प्रदेशात आज मुसळधार पावसाची शक्यता असून गिलगिट, बाल्टिस्तान, मुझफ्फराबाद, पंजाब आणि उत्तराखंडमध्ये काही ठिकाणी वादळ आणि गारपीट होईल तर कर्नाटकच्या किनारपट्टीवर उष्णतेची लाट येण्याचा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार